# मुंबई मेट्रो-३ मार्गावरील ट्रॅक टाकण्याचे ९२ टक्के काम पूर्ण

मुंबई : मुंबईतील पहिल्या भूमिगत मेट्रो-३ मार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा मुंबई मेट्रो रेल कोर्पोरेशनचा प्रयत्न आहे. डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत हा मार्ग मुंबईकरांच्या सेवेत दाखल होईल. त्या अनुषंगाने मेट्रो-३च्या ट्रॅक इन्स्टॉलेशनचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. फेज एक आरे ते बीकेसीमध्ये ट्रॅक इन्स्टॉलेशनचे ९२ टक्के काम पूर्ण झाले असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दिली आहे. कुलाबा-बांद्रा-सीप्झ यामार्गावर मेट्रो ३ या भुयारी मार्गाची कामे प्रगतिपथावर आहेत. फेज १ मधील आरे ते बीकेसी या मार्गावरील ट्रॅक उभारणीत पॅकेज पाचअंतर्गत ८३.९० टक्के; तर पॅकेज सहाअंतर्गत ९१.१७ टक्के; तर पॅकेज सातचे १०० टक्के ट्रॅक उभारणीचे काम पूर्ण झाले आहे. एकूण मार्गात पॅकेज पाचमध्ये ७.६ किमीच्या ट्रॅकचा समावेश आहे. त्यापैकी ६.३ किमीच्या ट्रॅकचे काम पूर्ण झाले आहे, तर पॅकेज सहामध्ये येणाऱ्या एकूण ८.३९ किमीपैकी ७.०६ किमीचे काम पूर्ण झाले आहे. पॅकेज सातमध्ये ८.५३ किमी मार्ग आहे. या संपूर्ण मार्गावर ट्रॅक उभारणी पूर्ण झाले आहे. मेट्रो-३ मार्गावरील ट्रॅक उभारणी जलद गतीने होत आहे, अशी माहिती एमएमआरसीएलने दिली आहे.



**मुंबई :** मेट्रो-३च्या ट्रॅक इन्स्टॉलेशनचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.